नि.फौ.ख.क्र. ५७/२०२१
सरकार-वि- राहूल व इतर
निशाणी क्र. ४९

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ यांची साक्ष.**

**<u>मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,</u>**

**<u>नाव</u>** - मयुर गजानन चौधरी

**<u>वय</u>** - ३० वर्ष, **<u>व्यवसाय</u>** - व्यवसाय

**<u>पत्ता</u>** - वाकोडी, तह. सावनेर, जि. नागपूर.

**<u>सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. एच.ए. डेकाटे यांच्यामार्फत</u>.**

मी आरोपींना ओळखत नाही. मी फिर्यादीला ओळखतो. मी फिर्यादीच्या शेजारी राहतो. दि. १२.०१.२०२१ रोजी फिर्यादीच्या घरातून आवाज येत होता. त्यांच्यामध्ये वादविवाद सुरू होता. आम्ही गाईच्या गोठयाजवळ बसलो होतो. पोलीसांनी आम्हाला बोलावून पंचनामा केला. मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. माझ्या सोबत दुसरा पंच अजय पराते होता.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्रीमती. यु. आर. पवार यांचेमार्फत</u>**

**२.** धुलीचंद तराळे हे माझे भाऊ लागतात. ते फिर्यादीचे वडिल होते. ते मरण पावले. धुलीचंद तराळे गावात वादविवाद झाल्यावर त्यांची मदत करायची की कसे हे मला माहित नाही. माझे धुलीचंद तराळे व फिर्यादी सोबतचे संबंध चांगले आहे. फिर्यादीचे लग्न कोरोना काळात झाले. हे म्हणणे खरे आहे की, लग्नात जास्त लोक नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, दि. १२.०१.२०२१ रोजीच्या दरम्यान लोकडाऊन होते. हे म्हणणे खरे आहे की, एकमेकांकडे जाणे बंद होते. हे म्हणणे खरे आहे की, मी फक्त आवाज ऐकला, तिथे कोण आले होते हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनेची मला काही माहिती नाही. फिर्यादीचा घरगुती वाद होता. तो कशा वरून होता हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही

की, फिर्यादी माझे नातेवाईक असल्याने मी तिच्या सांगण्यावरून साक्ष द्यायला आलो. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

SONPARI MAHENDRA GADE
Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2026.03.10 17:46:07 +0530

सावनेर,
दिनांक १०.०३.२०२६

(एस. एम. गाडे)
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
(न्यायालय क्र.०३) सावनेर

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Stenographer :- D. R. Aglawe